"वैशिष्ट्यपूर्ण"योजनेअंतर्गतनगरपरिषदांना
निधी मंजूर करण्याबाबत.
सन २०२३-२४लेखाशिर्ष (४२१७०६०३) अंतर्गत
हुपरी नगरपरिषद, जि. कोल्हापूर करिता
रक्कम रु.१.१० कोटी
जयसिंगपूर नगरपरिषद, जि. कोल्हापूर करीता
रक्कम रु. १.२० कोटी
वडगाव नगरपरिषद, जि. कोल्हापूर करीता
रक्कम रु. १.०३ कोटी
शिरोळ नगरपरिषद, जि. कोल्हापूर करीता
रक्कम रु. १.०३ कोटी
कुरुंदवाड नगरपरिषद, जि. कोल्हापूर करीता
रक्कम रु. १.२० कोटी
हातकणंगले नगरपंचायत, जि. कोल्हापूर करीता
रक्कम रु. १.०० कोटी
(एकुण रक्कम रु . ६.५६ कोटी)

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः-नपावै-२०२३/प्र.क्र.३२७(५)/नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०७ डिसेंबर,२०२३

संदर्भ :-

(१) नगरविकासविभाग, शासन निर्णय क्रमांकः- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर,२०१७वदि. ३० सप्टेंबर, २०२०

(२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२ एप्रिल,२०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत.सदर शासन निर्णयांच्या अनुषंगाने, **"वैशिष्ट्यपूर्ण"** या योजनेअंतर्गत राज्यातील नगर परिषद / नगर पंचायतींना निधी व कामे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान"या योजतेअंतर्गत **अ) हुपरी नगरपरिषद,जि. कोल्हापूर"करिता रक्कम रु.१.१० कोटी ब) जयसिंगपूरनगरपरिषद,जि. कोल्हापूर करिता रक्कम रु.१.२० कोटी क) वडगाव नगरपरिषद, जि. कोल्हापूर करिता रक्कम रु. १.०३ कोटी ड) शिरोळ नगरपरिषद, जि. कोल्हापूर करितारक्कम रु.१.०३ कोटी इ) कुरुंदवाड**

**नगरपरिषद, जि. कोल्हापूर करीता रक्कम रु.१.२० कोटी ई) हातकणंगले नगरपंचायत, जि. कोल्हापूर करीता रक्कम रु.१.०० कोटी असे एकुण रक्कम रु. ६,५६,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. सहा कोटी छपन्न लक्ष मात्र)** इतका निधी **सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील कामांकरीता मंजूर** करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना एकत्रित प्रकल्प खर्चाच्यामर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

३. सदर प्रकल्पाअंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा संबधित **"नगरपंचायत / नगरपरिषद"** राहील.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे. सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम

शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. <u>जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे."ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे. तसेच दर सहा महिन्यांनी जिल्ह्यांतर्गत या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचा आढावा घेणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील

पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१३. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात येत असलेल्या कामांना निधी वितरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१४. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "**नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान**"या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१६. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१७. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करु नये.

१९. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२२, दि.२८ मार्च,२०२२ व दि. २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

२२. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रीकांत आंडगे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, पुणे
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
४. जिल्हाधिकारी,कोल्हापूर
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२,कोल्हापूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४
११. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी,कोल्हापूर

१३. मुख्याधिकारी,हुपरी/जयसिंगपूर/वडगाव/शिरोळ/कुरुंदवाड/हातकणंगले नगरपंचायत/नगरपरिषद, जि.कोल्हापूर

१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभागमंत्रालय, मुंबई

१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२३/प्र.क्र. ३२७(५)/नवि-१६**

**दिनांक:- ०७ डिसेंबर,२०२३सोबतचेविवरणपत्र**

| अ.क्र. | कामाची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| | **हुपरी नगरपरिषद ता. हातकणंगले जि. कोल्हापूर** | |
| १ | वॉर्ड नं.१ चिटणीस घर ते यल्लमा मंदिर व गाठ हॉस्पिटल ते शितल पाटील घर कॉक्रीट रस्ता करणे. | १८.०० |
| २ | वॉर्ड नं.१ दिग्विजय खाडे घर ते गुंडू फिरगान घर आर.सी.सी. गटर्स करणे. | १२.०० |
| ३ | प्रभाग क्र.२ मधील विठ्ठल चौकात हायमास्क लाईट पोल बसवणे. | |
| ४ | वॉर्ड नं.८ चिदगे घर ते प्रकाश चौगुले घर आर.सी.सी. गटर करणे. | |
| ५ | वॉर्ड नं.४ आण्णासो म्हेतर घर ते अमित नरके घर ते साई कॉलनी मेन रोड ते नाईक सर कांक्रीट रस्ता करणे. | १०.०० |
| ६ | वॉर्ड नं.४ डॉ. पाटील घर ते नाईक सर पाठीमागील बाजू आर.सी.सी. गटर करणे. | १२.०० |
| ७ | हनुमान चौकात हायमास्ट बसवणे. | |
| ८ | आर.सी. गटर राजेंद्र गवळी घर ते रणजीत घरमोडे घर अंदाजे ४२० फूट लांबी (रस्ता रेडक्रॉस सह) | |
| ९ | प्रशांत आवळे हाऊस ते बंडू कुंभार हाऊस आरसीसी गटार सुमारे ३०० फूट लांब | १३.०० |
| १० | प्र.क्रमांक ८ आणि ९ R.C.C. तानाजी वरणकर घर ते बसलिंग माळी घर ते सुनील घोरपडे घरापर्यंतचा रस्ता | |
| ११ | प्र.क्र.२ गाट पाणंद रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | १०.०० |
| १२ | प्र.क्र.२ व्यंकटेश हायस्कूल ते हुपरी रेंदाळ बायपास रोड पर्यंत रस्ता करणे. | १०.०० |
| १३ | प्र.क्र.९ बालाजी पेट्रोल पंप ते बेमलापूरे नगर आर.सी.सी.गटर करणे. | १०.०० |
| १४ | प्र.क्र.२ आण्णासो मडीवळ घर ते फिरगान घर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | १५.०० |
| १५ | विशालनगर ग्राऊंड येथे ओपन जिम करणे / हायमास्ट बसविणे. | |
| | **अ) एकुण रक्कम र. लक्ष** | **११०.००** |
| | **ब) जयसिंगपूर नगरपालिका ता. शिरोळ जि. कोल्हापूर** | |
| **अ.क्र.** | **कामाची नावे** | **रक्कम रु. लक्ष** |
| १ | दीपनगर कमान ते जितेंद्र आहिर घर खडीकरण व डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २ | आंबा भंडग ते दिपक घोरपडे घर खडीकरण व डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ३ | कृष्णा कदम घर ते कांबळे गुरुजी घर दक्षिण उत्तर रस्ता ४ मीटरने डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ४ | भापकर घर ते म्हेशाळे घर दक्षिण उत्तर रस्ता ४ मीटरने डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ५ | फरास घर ते भासले घर दक्षिण उत्तर रस्ता ४ मीटरने डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ६ | सुतार घर ते अभय पाटील घर ते भुजर घर ते डॉ. जैन घर C टाईप रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १०.०० |

| अ.क्र. | कामाची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ७ | मच्छी मार्केट येथे विक्रेत्यांना R.C.C. आटे बांधणे. | १०.०० |
| ८ | मच्छी मार्केट येथे लादीकरणटाकणे व पार्कींग व्यवस्था करणे, | १०.०० |
| ९ | राजीव गांधीनगरमधील बाळू मामा मंदिर देवालय इमारत हॉल बांधणे व सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| १० | विजयमाला नगर सुभाष कदम ते भोसले यांचे घरापर्यंत हाफ रार्कड गटर करणे. | १६.०० |
| ११ | शिरोळ वाडी रोड झेले हायस्कूल ते बुरसे यांच्या पर्यंत फुटपाथ वर ओपन जिम करणे. | |
| १२ | जयसिंगपूर शिंदे कॉलनी अंतर्गत रस्ता करणे व सोई सुविधा पुरविणे. | १४.०० |
| | **ब) एकुण रक्कम रु.** | **१२०.००** |
| | **क) वडगाव नगरपरिषद ता. हातकणंगल जि. कोल्हापूर** | |
| **अ.क्र.** | **कामाची नावे** | **रक्कम रु. लक्ष** |
| १ | आदर्श कॉलनी सिन्हा घर से मेजर घर दोन्ही बाजूस आर सी सी गटर्स करणे. | १५.०० |
| २ | शाहू कॉलनी तोफीक अनसारी घर ते पटेल दुकान आर सी सी गटर्स करणे. | २४.०० |
| ३ | शाहू कॉलनी वाघमोडे घर ते रोहन बुरुड आर. सी. सी. गटर्स करणे. | |
| ४ | राम नगर अंतर्गत रस्त्यास दोन्ही बाजूस आर सी. सी. गटर्स करणे. | |
| ५ | कल्याणी कॉलनी परसू ठेकणे ते दगडू सुतार आर.सी.सी.गटर्सकरणे. | ४१.०० |
| ६ | गणेश कॉलनी परसु ठेकणे ते दगडु सुतार आर. सी. सी. गटर्स करणे. | |
| ७ | बाळू पाटील ते दगडू सुतार आर. सी. सी गटर्स करणे. | २३.०० |
| ८ | प्रीतम नेर्लेकर घर ते जाधव वकील आर. सी. सी. गटर्स करणे. | |
| ९ | डॉ.बडेकर घर ते माने घरआर. सी. सी. गटर्स करणे. | |
| १० | दशरथ खोत ते सार्वजनिक शौचालय पर्यत आर. सी. सी. गटर्स करणे. | |
| | **क) एकुण रक्कम रु. लक्ष** | **१०३.००** |
| | **ड) शिरोळ नगरपरिषद ता. शिरोळ जि. कोल्हापूर** | |
| **अ.क्र.** | **कामाची नावे** | **रक्कम रु. लक्ष** |
| १ | प्रभाग क्र.१ मधील सुहास राजमाने घर ते शिरोळ जयसिंगपूर मुख्य रस्ता व बाळू पाटील यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २ | प्रभाग क्र.२ मधील चर्मकार समाज स्मशानभुमीची संरक्षण भिंत बांधणे. | १०.०० |
| ३ | प्रभाग क्र.३ मधील किरण शिंदे घर ते बाबासाहेब जगताप घर रस्ता तेबाबासाहेब जगताप घर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे, अंडरग्राउंड गटर्स बांधणे, C D वर्क करणे. | १५.०० |
| ४ | प्रभाग क्र.४ मधील रामप्रसाद पाटोल घर ते शिरोळ जयसिंगपूर रस्त्यापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व अंडरग्राउंड गटर्स बांधणे. | १५.०० |
| ५ | प्रभाग क्र.४ मधील विवेक चुडमुंगे घर ते संभाजी पाटील घर व भरमू कोडेकर घर ते विश्वास माने घर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | १३.०० |

| अ.क्र. | कामाची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ६ | प्रभाग क्र.५ मधील बाळासो केंगारे घर ते बाळासो खडके घर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | १५.०० |
| ७ | प्रभाग क्र.५ मधील जहांगीर सुतार घर ते दिनकर भाट घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १५.०० |
| ८ | प्रभाग क्र.६ मधील प्रविण कोरवी घर ते संदीप कोरवी घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे वआर.सी.सी. गटर्स करणे व मेस्त्री घर ते नवशाक्ती मंडळ अंडरग्राऊंड गटर्स करणे. | १०.०० |
| | ड) एकुण रक्कम रु. लक्ष | १०३.०० |
| | **कुरुंदवाड नगरपरिषद ता. शिरोळ जि. कोल्हापूर** | |
| **अ.क्र.** | **कामाची नावे** | **रक्कम रु. लक्ष** |
| १ | प्र.क्र.४ मध्ये अशोक चोरगे घर से मतवाल घर पर्यंत रस्ता कॉंक्रीट व गटर करणे. | १०.०० |
| २ | प्र.क्र. ४ मध्ये संदिप आडसूळ घर ते वाडेकर घर पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे व गटर करणे. | १५.०० |
| ३ | प्र.क्र. ४ मध्ये दबासे घर ते सलिम नाईकवडे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १०.०० |
| ४ | प्र.क्र.४ मध्ये बाळासो संकपाळ घर ते चंद्रकांत जाधव घर रस्ता कॉंक्रीट करणे. | १०.०० |
| ५ | प्र.क्र.४ मध्ये समोर सय्यद घर ते चाळके घर रस्ता कॉंक्रीट करणे. | १५.०० |
| ६ | प्र.क्र.५ मध्ये विक्रम जाधव घर ते अनिल खिलारे घर रस्ता कॉंक्रीट व गटर करणे. | |
| ७ | प्र.क्र.५ मध्ये लंबे हॉस्पोटल ते बागवान घर ते जमादार दुकान रस्ता कॉंक्रीट व गटर करणे. | १५ .०० |
| ८ | प्र.क्र.५ मध्ये राजीव टायपिंग ते महाडीक घर रस्ता कॉंक्रीट करणे. | १०.०० |
| ९ | प्र.क्र.१ मध्ये सुनिल कोळेकर घर ते प्रधाने घर रस्ता कॉंक्रीट करणे. | १०.०० |
| १० | प्र.क्र.३ मध्ये गोंधळ गल्ली मधील लादीकरणकाढून रस्ता कॉंक्रीट करणे. | १०.०० |
| ११ | प्र.क्र.३ मधील कोरवी गल्ली अंतर्गत रस्ते कॉंक्रीट करणे. | १५.०० |
| १२ | प्र.क्र.१ मध्ये आण्णाप्पा कोरवी घर ते मल्लाप्पा कोळी घर रस्ता कॉंक्रीट करणे. | |
| | इ) एकुण रक्कम रु. लक्ष | १२०.०० |
| | **हातकणंगले नगरपंचायत ता. हातकणंगले जि.कोल्हापूर** | |
| **अ.क्र.** | **कामाची नावे** | **रक्कम रु. लक्ष** |
| १ | गणपती मंदिर ते वसगडे मळा रस्ता करणे. | २०.०० |
| २ | लक्ष्मी मंदिर ते अशोक गोसावी घर रस्ता रुंदीकरण करणे. | |
| ३ | स्मशान भूमी ते राजाराम नाधवडेकर घर डांबरीकरण रस्ता करणे. | |
| ४ | गुरुकृपा कॉलनी अंतर्गत रस्ते व गटर्स करणे. | १०.०० |
| ५ | गुलमोहर कॉलनी थोरात घर ते घोलपे प्लॉट पर्यंत दुतर्फा गटर्स करणे. | १३.०० |

| अ.क्र. | कामाची नावे | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ६ | सुख सागर हॉटेल मागील बाजूचा रस्ता ते विष्णु पवार पिठाची गिरणी रस्ता करणे वस्ट्रीट लाईट पोल बसविणे. | |
| ७ | बाबुजमाल तालीम वरचा मजला सांस्कृतिक भवन बांधणे. | १३.०० |
| ८ | मानाजी फाकडे येथे पुलावर हायवे लगत मोठा हायमास्ट बसविणे. | १५.०० |
| ९ | शिवाजी चौक खालची गल्ली / जैन मंदिर कॉर्नर । विकास सेवा सोसायटी चौक / स्मशानभूमी इंडस्ट्रीयल रोड / स्टेट बँक कॉर्नर पेठा भाग / येथे हायमास्ट बसविणे. | |
| १० | नरसिंह मंदिर धर्मशाळा बांधणे व इतर सेवा सुविधा पुरविणे. | १५.०० |
| ११ | तुलसी हॉटेल पेठा भाग ते रावसाहेब शिंगे घर कॉंक्रीटीकरण करणे. | १४.०० |
| | **ई) एकुण रक्कम रु. लक्ष** | १००.०० |
| | **(अ) ते (ई) एकुण रक्कम रु. लक्ष** | ६५६.०० |